
[ अंक ३ रा. वर्ष २५ वें ]

# "श्री साईलीला"

त्रैमासिक



वार्षिक वर्गणी रु. २-४-०

# श्री साई लीला

## श्री साईनाथ प्रसन्न



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ।
प्रदूर्भूत्वाऽत्मभूत्या निशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥

वर्ष २५ ]  त्रैमासिक – सप्टेंबर १९४८  [ अंक ३ रा.

## –: संपादकीय :–

प्रेम, सत्य आणि विश्वास ह्या त्रिपुटीच्या साहाय्यानें नराचा नारायण होतो. विश्वास देणें व संपादन करणें प्रत्येक मानवप्राण्याच्या स्वाधीन आहे. विश्वास हा कल्पवृक्ष आहे. तो वाटेल तें आपणांस साध्य करून देईल. विश्वास हीच खरी सिद्धी होय. विश्वासानें बरींचशीं कामें सहज लीलेनें होतात. नुसत्या पैशानें भागत नाहीं; त्याला मनुष्यबळ पाहिजे. आणि मनुष्यबळ म्हणजे विश्वासाची ( पत ) देवघेव करणें आवश्यक आहे. परंतु या कलियुगांत स्वतःच्या अहंपणामुळें व जास्त अक्कलहुषारीनें जो तो म्हणतो मीच शहाणा. ‘ अति शहाणा त्याचा बैल रिकामा ’ ह्या म्हणीप्रमाणें त्याची स्थिति मात्र होते.

आपण पाहातों कीं, पुष्कळशा सामाजिक अगर धार्मिक संस्था, भजनमंडळें, सामाजिक अगर धार्मिक मासिकें, त्यांच्या सभासदांत मतभेद होऊन, एकमेकांवरचा विश्वास उडून, त्या संस्था मोडतात अगर मोडकळीस येण्याच्या बेतांत असतात. म्हणून संस्थेंत, समाजांत अगर एखाद्या मंडळांत परस्परांविषयीं विश्वास, प्रेम व आपलेपणा

शेवटीं ती अध्यात्म देवता उमा त्या देवांना म्हणाली, 'अरे वेड्यांनो, 'मी श्रेष्ठ, मी श्रेष्ठ' असें भांडतां काय? कोणिही श्रेष्ठ नाहीं व कोणिही कनिष्ठ नाहीं. त्या विश्व-शक्तीनें इंद्राच्या ठिकाणीं पाऊस पाडण्याची शक्ति ठेवली म्हणून इंद्र पाऊस पाडूं शकतो. वाऱ्याच्या ठिकाणीं वाहाण्याची शक्ति आणि अग्नीच्या ठिकाणीं जाळण्याची शक्ति ठेवली आहे. जर त्या विश्वशक्तीनें ती शक्ति काढून टाकली तर तुम्हीं शून्य आहांत. त्या शक्तीचा अहंकार नका बाळगूं, आणि दुसऱ्यास हीन नका समजूं.'

एखाद्यावर विश्वास टाकावा परंतु अंध विश्वास मात्र नको. कारण हें कलीचें राज्य आहे. आपण स्वतः कष्ट केलेच पाहिजेत 'जो दुसऱ्यावरी विश्वासला। त्याचा कार्यभाग बुडाला। जो स्वयेंचि कष्टत गेला। तोचि भला।'

साईलीलेचा दुसरा अंक आपणांस मिळाला असेलच. आपण सर्वांनीं त्या मासिकाचा गैरविश्वास केला. तें मासिक आपल्या सर्वांच्या विश्वासावर निघालें. अद्याप त्याला आपणाकडून कोणत्याहि तऱ्हेचा मुलामा मिळत नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

निसर्गाकडे पाहा—तो सागर आपणांस अमृत (मीठ) देतो. शेतें भात देतात. झाडें फळें देतात. जर त्या निसर्गानें सर्वांचा विश्वासघात केला, तर तुमच्याकडे पैसा असून तुमची स्थिति काय होईल? निसर्ग आपणां सर्वांस हेंच शिकवीत आहे कीं, विश्वास संपादन करा. त्याची देवाण-घेवाण करा. स्वतःचा अहंकार, अभिमान, ताठा कमी करा. जसजसें 'अहं' चें रूप क्षुद्र होत जाईल तसतसें 'परब्रह्म' तुम्हांस दिसूं लागेल.

विश्वास म्हणजे जादूची कांडी आहे. जशी फिरवाल तशी काम देईल. गैर-विश्वास मात्र जळतें कोलीत आहे. तरी सर्व भक्त बंधू-भगिनींनो, विश्वास संपादन करा व विश्वासानें काय होत नाहीं तें पाहा!

संपादक.

---

# 'श्रीसाईबाबांच्या उदीचें महिमान'

उदी-अंगारा राख ही धुनीमाईपासून प्रसवली. श्री साईबाबांच्या कारकीर्दीत व त्यांच्या पश्चात् ती गोणीच्या गोणी लोकांस पुरविली गेली आहे व पुरविली जात आहे. ही धुनी स्वतः श्री साईबाबांनीं शिरडीच्या मोडक्या तोडक्या जीर्णावस्थेस आलेल्या मशिदींत-जीला द्वारकामाई संबोधलें जातें-प्रज्वलित केली.

श्री साईबाबा हे स्वतः निजामशाहींत नांदेडगांवांत एका ब्राह्मण कुलांत जन्मले. त्यांचे आईबाप फार गरीब असल्यामुळें त्यांनीं या बाळाला एक वर्षाचा असतांना एका नांदेडच्या जंगलांत ठेवून दिलें व निघून गेले. त्याच जंगलांत एक मुसलमान फकीर तिकडून येत होता. त्यांनीं या बाळाला उचलून घरीं आणलें व फकिरानें व त्याच्या बायकोनें या बालकाचें लालनपालन केलें.

फकिर वयोवृद्ध असल्यानें तो थोड्याच वर्षांनीं अल्लाच्या घरीं गेला. त्यानें अंत-समयीं आपल्या बायकोला, 'ह्या मुलाला तूं व्यंकूसहाच्या स्वाधीन कर. हा ब्राह्मण कुलांत जन्मला आहे.' असें सांगितलें. व्यंकूसहा हे ब्राह्मण असून पारमार्थिकांत ते फार पुढें गेलेले होते.

एके दिवशीं या फकिर बाईनें त्या मुलास श्री व्यंकूसहाच्या घरीं आणलें व त्याच्या पायांवर त्यांना घातलें. व्यंकूसहानें त्यांना आपल्याच वाड्यांत ठेवून घेतलें व व्यंकू-सहाच्या देखरेखीखालीं हें बाळ वाढलें गेलें.

व्यंकूसहा श्रींना नेहमीं जंगलांत घेऊन जात असत व बराच वेळपर्यंत ते दोघे तेथें राहात. त्यांच्या दुसऱ्या शिष्यसमुदायांत श्रीविषयीं बोलणीं सुरू झालीं व एके दिवशीं कांहीं शिष्य जंगलांत गेले. तेथें व्यंकूसहा व बाबा एकाच पांघरुणांत झोपलेले आहेत असें पाहून त्यांच्यांतील एकानें श्री. बाबांना मारण्याकरतां एक दगड डोक्यांत मारला व ते पळून गेले. तो दगड बाबांना न लागतां श्रीव्यंकूसहला लागला व त्यांच्या डोक्यांतून भळभळ रक्त वाहूं लागलें. बाबांनीं एक फडका त्यांच्या डोक्याला बांधला व त्यांना घरीं घेऊन आले.

श्रीबाबांनीं अहोरात्र आपल्या गुरूची सेवा केली, पण त्यांचा त्यांतच अंत झाला. मरतेसमयीं आपल्या डोकीचा फडका काढून व्यंकूसहानीं श्रीबाबांच्या डोकीला बांधला व आपल्या गुरूंचा आशिर्वाद म्हणून समाधिस्थ होईपर्यंत श्रीसाई तो डोक्यास बांधित असत.

श्रीव्यंकूसहांना श्रीबाबांच्या हस्तें शास्त्रोक्त अग्निसंस्कार झाला व त्यांतलेंच एक जळतें कोलीत घेऊन त्यांनीं ही धुनीमाई प्रगट केली, व आपल्या गुरूची अमरज्योत ह्या कालपर्यंत चालू ठेविली.

ते स्वतः धुनीकरतां लांब लांब जाऊन जंगलांतून मोठमोठालीं लांकडें आणीत व त्यांत झालेली राख उदी-अंगारा म्हणून ते सर्वांस देत व कपाळास लावीत असत.

[ वरील माहिती कै. धुमाळ, ज्यांना श्रीसाई भाऊ म्हणत, वकील नाशिक व रा. रा. अवस्थी, रि. सबजज्ज, पुणें, यांच्याकडून मिळाली. स्वतः श्रीसाईनीं ही गोष्ट सांगितली आहे असें दोघांचें म्हणणें आहे. खरें व खोटें, श्रीसाईच जाणें. रा. रा. श्रीपाद नाईक, ह्यांनीं 'हेटकरी' सप्टेंबर १९४८ च्या अंकांत, 'अक्कलकोट स्वामी' ह्या मथळ्याखालीं श्रीसाईबाबांची माहिती दिली आहे. वरील माहितीचा व तिचा मेळ बसत नाहीं. असो, मीं स्वतः श्रीसाईबाबांना पाहिलें आहे. आज त्यांना समाधिस्थ होऊन ३२ वर्षें झालीं. परंतु त्यांच्या आतगोतांपैकीं एकहि इसम शिरडी मुक्कामीं आलेला ऐकण्यांत व पाहण्यांत नाहीं. कै. दाभोळकर, ज्यांना श्रीबाबांनीं हेमाडपंत पदवी दिली व स्वतःचें चरित्र लिहवून घेतलें, तें 'दाभोळकरकृत श्रीसाई सत्चरित्र' दुसरी आवृत्ति आज तयार आहे. त्यांतसुद्धां श्रीसाईबाबांच्या आईबापांचा अगर त्यांच्या आतगोतांचा पत्ता मिळत नाहीं. फक्त त्यांचे गुरु 'व्यंकूसहा' होते एवढें आहे. ]

ही उदी आपणांस काय सांगते व काय शिकवते—

देहही पंचाभूतांचें काष्ठ । भोग भोगावया अवशिष्ठ ।
भोग सरतां पडेल निचेष्ठ । होईल विस्पष्ठ ही राख ॥

बा मानवा ! देहाची अशीच राख होणार आहे, असें ही उदी सांगत आहे, तरी सावध रहा. माया, महामाया, आदिमाया ह्यांच्या कांटेरी कुंपणानें हें विश्व चोहों बाजूंनीं वेष्टिलें आहे, ब्रह्म सत्य, ब्रह्मांड अनृत ह्याची जाणीव ही उदी देत आहे.

ह्या मायारूपी जगांत कोणी कोणाचें नाहीं. भाऊबंद, आप्तइष्ट सर्व पैशाचे आहेत. निर्वाणीचा सखा मात्र पांडुरंग. आपण नग्न आलों, नग्न जाणार.

जो जन्मला तो मेला; परंतु बारसें मात्र आनंदानें, थाटानें बर्फी–पेढे वाटून करतात, आणि तोच मेल्यावर धायधाय रडतात. मृत्यु या शब्दाच्या ठिकाणीं जी वियोगाची कल्पना आहे तीच आमच्या दुःखास कारणीभूत होते. परंतु एखाद्या मित्राचें ज्याप्रमाणें आपण स्वागत करतों त्याप्रमाणेंच मृत्यूचें स्वागत करण्याची आपल्या मनाची तयारी असल्यावर त्यापासून जिवास दुःख अगर त्रास होण्याचा मुळींच संभव नाहीं.

जीवन व मरण हीं दोन्हीहि मंगल आहेत. मृत्यु हें ईश्वराचें एक स्वरूप आहे. मृत्यु म्हणजेच जीवनवृक्षाला लागलेलें गोड फळ आहे.

मरण हें पेरणें जन्म हें उगवणें । हे मायेचि खूण जाणीतली ॥
संग तुझा पुरे संग तुझा पुरे । संग तुझा पुरे नारायणा ॥
तूं तरी न मरे मी तरी न मरे । भक्ति हे संचरे हाचि लाभू ॥
विठा म्हणे केशवा ठांईचा मी नेणें । गर्भवास भोगणें तुझी लाज ॥

देह म्हणजे एक मडकेंच आहे. त्या जगन्नायकानें ही देहरूपी मडकीं बनवलीं. कांहीं लहान, कांहीं मोठीं, कांहीं कच्चीं, कांहीं पक्कीं, फुटलेली नवीन बनाविलीं व अखिल सृष्टीच्या बागवानाकडे हीं सर्व पृथ्वीवर नंदनवन करण्याकरितां धाडून दिलीं.

मृत्यु म्हणजे महायात्रा, महानिद्रा, महाप्रस्थान. आपण दररोज अगदीं गाढ झोपतों. झोंप म्हणजे काय ? तर लघु मरणच–सून माहेरीं जाऊन सासरीं येते तसेंच नव्हे का हें ?

फाल्गुन मासांत शिमगा येतो. घरोघर होळी पेटते. गांवांत सार्वजनिक मोठी होळी पेटते. त्या दिवशीं मोठमोठाले सभ्य गृहस्थ होळीवर जमून फांका घालतात. हुरडा, नारळ, ऊंस वगैरे जिन्नस होळींत भाजून प्रसाद म्हणून खातात. होळी म्हणजे सर्वस्वाची होळी कर. वर्षांत केलेलीं अगर घडलेलीं घाणेरडीं कृत्यें, मनांत, हृदयांत, ध्यानांत असलेलीं सर्व पापें, काम–क्रोध–लोभ ह्यासारखे राक्षस बोम्बारूपी ओकाऱ्या काढून जाळून टाक. आणि मी आज शुद्ध झालों, पावन–पवित्र झालों म्हणून तिच्यांतील रक्षा कपाळाला लाव आणि रंगपंचमीचा रंग आनंदानें मनसोक्त लूट.

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।
कामः क्रोधस्तथालोभस्तस्मातदेतत्त्रयं त्यज्येत् ॥

भ. गीता, अ. १७ श्लोक २१.

आई मुलाची दृष्ट काढते तेव्हां ती मीठमोहरी घेऊन बाळाच्या अंगावरून काढून चुलींत टाकते व चुलींतील राख त्याच्या कपाळास लावते. तेव्हां ती म्हणते ' आल्या-गेल्याची, म्हाताऱ्या-कोताऱ्याची कोणाची दृष्ट लागली असेल तर चुलींत पडो.'

देवापुढें अगरबत्ती पेटते. ती जळतांना सर्वांना सुगंध देते. अंतिम तिची राख मात्र आपण कपाळास लावतों.

समई जळते, त्याला काजोळी येते म्हणजे वातीचें तेल जळून राख होतांना वात आपणांस प्रकाश देते. वात म्हणजे अहंपणा, तो जाळल्याशिवाय आत्मतेज पडणार नाहीं.

न करितां स्नेहाची रांगोळी ।
अज्ञानतमाची काजळी ॥
' मी मम ' या वातीची होळी ।
ज्ञान न पाजळी निजप्रभा ॥

अंगाला भस्माचे पट्टे, तोंडावर चंदनाच्या मुद्रा काढायच्या, चंदनाचे टिळे लावायचे आणि त्याप्रमाणें वर्तन न करतां कोरडें राहायचें, मग तें लावतां तरी कशाला !

संध्या करतांना, देवपूजेच्या वेळीं अंगास भस्म लावतात. स्वार्थाची सुखविलासांची राख रांगोळी करून, सर्वेंद्रियांच्या वासनांचें जेव्हां भस्म होणार तेव्हां हा ' रमामाधव-साई ' हातीं मिळणार आणि मग ती देवपूजा खरी ठरणार, नाहींतर दांभिकपणाच होईल.

काळ जवळचि उभा नेणां । घाली झांपडी खुंटी काना ॥
कैसा सावध हुशार राही । आपुला तूं आपुले ठायीं ॥
काळ जवळचि उभा पाहीं । नेदी कोणासी देऊं कांहीं ।
तुका म्हणे काळा । कर्म मिळतें तें जाळा ॥

ही उदी-भस्म हेंच सांगत आहे कीं काळ जवळ उभा आहे, संसार क्षणभंगुर आहे. तथापि आम्ही संसारांत इतके गढून गेलेलों असतों कीं विश्रांतीशिवाय रात्रंदिवस धडपड करण्यामध्येंच आपणांस आनंद होतो. आणि शेवटीं तो सुद्धां अपुरा टाकून जाण्याचा प्रसंग येतो.

आलें देवाजीच्या मना । तेथें कोणाचें चालेना ॥

मृत्यु दारावर येतांच त्याला तूं काय अर्पण करणार ? त्याला मी रीत्या हातानें जाऊं देणार नाहीं. माझा प्राण त्याच्या स्वाधीन करीन. माझ्या जीवनपात्रांमध्यें निर-निराळ्या ऋतूंत जे रस निर्माण झाले ते रस, हृदयांतील सुखदु:खें व आजपर्यंत केलेला धनसंचय ( पुण्य ) मृत्यूला अर्पण करीन.

अशा तऱ्हेची तयारी आपण ठेवली पाहिजे म्हणजे मृत्यूचें भय आपणांस वाटणार नाहीं. आपण सर्व ' अहं'च्या, ' मी ' पणाच्या स्वाधीन झालों तरीपण शेवटीं मनुष्य मी निर्बल, मी दीन, मी मर्त्य ' असें प्रांजलपणें कबूल करतो.

म्हणून प्रत्येक मानवानें नुसता अंगारा लावून चालणार नाहीं. त्या उदीच्या पोटीं भरलेला महत्त्वाचा उपदेश, आदेश, आज्ञा ध्यानांत घेऊन, अहंपणाच्या 'मी'ला झुगारून देऊन उपजत 'मी'ला प्रगट करा.

अनेक जन्मींच्या पुण्यसंचयामुळें नरदेहाची प्राप्ती होते. देह हेंच देवालय असून त्यांतील जीवात्मा हाच देव आहे. जसें देऊळ आपण स्वच्छ, शुद्ध, आनंदकारक ठेवतों, तसेंच हें देऊळ प्रत्येक मानवानें आपल्या आचरणानें उत्तम प्रकारें जोपासना करून शुद्ध, स्वच्छ व निर्मल स्थितींत राहील असें केलें पाहिजे.

ज्याप्रमाणें सुंदर मूर्तींची संभ्रमानें स्थापना करावी आणि पुढें देवालयाची दुर्दशा होऊन ती मूर्ति जागच्या जागीं पूजेशिवाय पडून रहावी, तद्वत आमच्या जन्मवेळीं केलेला आनंदोत्सव, या देहाचा दुरुपयोग केल्यास पुढें चालू राहणें शक्य नाहीं. म्हणून हें देहरूपी देवालय सुदृढ स्थितींत राहून तें वंदनीय व निर्मळ करणें हेंच योग्य आहे.

नरदेहाचें वर्णन नाथांनीं वर्णिलें आहेः—

मनुष्यदेहीं ब्रह्मप्राप्ति । तो देह भाव नसावा चित्तीं ।
विदेहत्वें परमार्थगति । विवेक सद्युक्ति निज पुरुषार्थ ।
नरदेहा ऐसें गोमटें । शोधितां त्रैलोक्यीं न भेटे ।
आणि देहा ऐसें वोखटें । अत्यंत खोटें आन नाहीं ।
वोखटें म्हणून न त्यागावें । तरी मोक्षसुखा नागवावें ।
गोमटें म्हणून भोगावें । तैं अवश्य जावें अधःपाता ।
हें भोगावें न त्यागावें । निज पुरुषार्थ लागावें ।
भगवन्मार्गी लावावें । तरींच सुखा ॥

ही जीवनमुक्त स्थिति संपादणें हेंच जीवित-साफल्य आहे आणि ही अवस्था देहाला प्राप्त झाल्यावर विश्वचैतन्यामध्यें आत्मचैतन्याची ज्योत मिळून जाते, आणि सर्व भेदभाव नष्ट होतो. मग 'साईलीलेच्या' दुसऱ्या अंकांतील चुटक्याप्रमाणें, यमपुरी खरोखरच खारीपुरी, बदामपुरी, पाकपुरी सारखी आहे असें अनुभवास येईल.

मरण माझें मरोन गेलें । मज केलें अमर ॥
ठाव पुसिले बुड पुसिले । वोस वोसले भेदभाव ॥
आला होता गेला पूर । धरीला धीर जीवनीं ॥
तुका म्हणे बुनादीचें । जालें साचें उजवणें ॥

संपादक.

---

# साई–प्रभाव

(१)

डॉ. के. बी. गव्हाणकर ॐ मुंबई ता. २७–८–१९४८

संपादक ‘श्री साईलीला’ काळाचौकी रोड, मुंबई नं. १२.

डॉ. गव्हाणकर यांस सा. न. वि. वि.

श्री साईबाबांबद्दलचे अनुभव कळवावें असें जूनच्या ‘श्री साईलीला’ अंकांत वाचलें. तेव्हां मला आलेला अनुभव आपणांस कळवावा असें वाटूं लागलें. माझे मित्र-बंधु आर. एन्. समेळ यांजकडून मला पहिल्यानें श्री साईबाबांबद्दल माहिती मिळाली. व त्यांच्याजवळील इंग्लिश पुस्तकेंहि वाचण्यास मिळालीं. तीं वाचून श्री साईबाबांचे भक्तीस मी लागलों व श्री साईसंस्थानचा साधा सभासद झालों. तेव्हां मला संस्थानांतून उदी वगैरे पाठविण्यांत आली. माझा लहान मुलगा मधुकर याचा जन्म १९४२ सालीं मार्च महिन्यांत झाला. जन्मापासून त्याच्या बेंबीच्या आंतून अर्धा इंच उंच एक मांसाचा कोंब बाहेर आलेला होता. ऑपरेशन करून तो कोंब काढावा लागेल व न काढल्यास मुलास मोठेपणीं त्रास होईल असें त्यावेळीं मॅटरनिटी हॉस्पिटलच्या डॉक्टरांचें मत पडलें. मुलगा अगदींच लहान असल्यानें ऑपरेशन करून घेण्यास त्यावेळीं माझें मन धजेना. परंतु मुलगा जसजसा वाढत चालला तसतसा त्याच्या बेंबीवरील कोंब वाढत चालला व बेंबीमधून पाण्यासारखा स्राव पाझरूं लागला, व अधून-मधून रक्त येऊं लागलें. त्यामुळें त्याचे कपडे खराब होत आणि दिवसांतून दोनदां बदलावे लागत. तसेंच वरचेवर त्यास शिकपणाहि येऊं लागला. पोटाचें ऑपरेशन करून तो कोंब काढावा लागेल व त्यासाठीं हॉस्पिटलमध्यें ठेवावा लागेल, असें डॉक्टरांचें मत पडलें. ऑपरेशनची धास्ती वाटत असल्यानें व आर्थिक परिस्थिति समाधानकारक नसल्यानें ऑपरेशनच्या खर्चाची विवंचना मनाला डंवचत होती. हेंहि एक कारण ऑपरेशन पुढें ढकलण्यास पुरेसें होतें. अशीं ६ वर्षें गेलीं. ह्या वर्षी मे महिन्यांत माझा मुलगा जेव्हां परत आजारी पडला तेव्हां माझ्या फॅमिली डॉक्टरनीं सांगितलें कीं तुम्हीं मुलाच्या पोटाचें ऑपरेशन लवकर करून घ्या नाहींतर मुलाची प्रकृति चांगली रहाणार नाहीं. तेव्हां डॉ० कांती जे. शेट, एफ्. आर. सी. एस्, यांच्याकडे मुलास नेलें व एक्स रेज् मशिननें तपासल्यावर त्यांनीं सुद्धां ऑपरेशन करावें लागेल, व ७।८ दिवस हॉस्पिटलमध्यें ठेवावा लागेल असें सांगितलें. माझी परिस्थिति पाहून डॉ० शेठ यांनीं ऑपरेशनची फी फारच कमी म्हणजे रुपये २० सांगितली व ता. ५ मे १९४८ रोजीं ऑपरेशन करण्याचें ठरविलें. त्या दिवशीं मुलास मी श्रीसाईबाबांची उदी लाविली व श्रीसाईबाबांची प्रार्थना केली कीं, ‘ऑपरेशन उत्तम तऱ्हेनें पार पडूं दे व मुलास कोणताच त्रास होऊं नये.’ हॉस्पिटलांत

जातांना माझ्या जवळील ‘श्रीसाईसचरित’ ग्रंथ बरोबर घ्यावा असा माझा विचार होता, परंतु तो ग्रंथ बराच मोठा असल्यामुळें, नंतर मी ‘श्रीसाईलीला,’ त्रैमासिकाचा जानेवारी १९४८ चा अंक माझ्याबरोबर घेऊन सकाळीं हॉस्पिटलमध्यें गेलों. ऑपरेशनची तयारी होती पण डॉक्टर दुपारीं येणार असें कळलें. तेव्हां ‘श्रीसाईलीला’ मासिक सकाळपासून दुपारीं डॉक्टर येईपर्यंत वाचित राहिलों. दुपारीं डॉक्टर आले तेव्हां ते स्वतः होऊनच म्हणाले कीं, ‘मुलाच्या पोटाचें ऑपरेशन न करतां हा कोंब काढण्याचा मी प्रयत्न करतों व तो अयशस्वी झाला तरच ऑपरेशन करतों.’

नंतर मुलास ऑपरेशनरूममध्यें नेण्यांत आलें. आम्ही सर्व घरांतील मंडळी बाहेर बसलों. आंत मुलगा रडूं लागला. आम्हांला काळजी लागली. माझी छाती तर धडधडूं लागली. ऑपरेशनची भीति उत्पन्न झाली. तेव्हां परत मी ‘साईलीला’ मासिक घेतलें व भावपूर्वक वाचूं लागलों. मुलाचें रडें थांबलें आणि मी शेवटचें पान संपवून मासिक बंद करून कव्हरवरील श्रीसाईबाबांचे फोटोसें नमस्कार केला. तेवढ्यांत आंत डॉक्टर बोलावित आहेत असें नर्सनें येऊन सांगितलें. आम्हीं आंत गेलों आणि पाहतों तर मुलगा स्वस्थ पडला असून माझ्याकडे पाहून हंसत आहे. तेवढ्यांत डॉक्टरनीं माझ्या हातावर बेंबीवरील तो कोंब काढून ठेवला. रक्ताचा थेंब नाहीं कीं मुलास त्रास नाहीं. ज्या धास्तीमुळें आज इतकीं वर्षें ऑपरेशन लांबणीवर टाकलें होतें ती धास्ती तर शिल्लक राहिली नाहींच तर उलट अर्ध्या तासाचे आंत पोटाचें ऑपरेशन न करतां कोंब काढतां आला. ही त्या साईबाबांची मी कृपाच समजतों. जादूप्रमाणें बेंबींतील कोंब अलग निघाला. डॉक्टरनासुद्धां आश्चर्य वाटलें. नंतर इलेक्ट्रिक मशिननें इलाज करून पोटावर पट्टी बांधण्यांत आली व फक्त एकच दिवस हॉस्पिटलमध्यें काढावा लागला. डॉक्टनींसुद्धां उदार अंतःकरणानें–पोटाचें ऑपरेशन न केल्यामुळें–फीमधून रुपये दहा परत दिले. ही सर्व लीला श्रीसाईबाबांची असावी असा माझा दृढ विश्वास आहे. आतां मुलगा चांगला असून कोणत्याहि प्रकारचा त्रास त्याला होत नाहीं.

आपला नम्र

**ग. ला. तळवडेकर**

(२)

१९३५ सालीं मी टायफाईडनें आजारी होतों. डॉ. के. बी. गव्हाणकर यांचें औषध चालू होतें. मला त्यांनींच १० व्या दिवशीं के. इ. एम्. हॉस्पिटलमध्यें ठेवलें. तापाच्या चौदाव्या दिवशीं मी बेशुद्ध झालों व माझी आशा सर्वांनीं सोडली. चिंताग्रस्त झालेले माझे आईबाप डॉ. गव्हाणकर यांजकडे, त्यांच्या घरीं गेले, व त्यांनीं माझी स्थिती त्यांना वर्णन करून सांगितली. त्यावेळीं डॉक्टरसाहेबांनीं त्यांच्याजवळ असलेल्या श्रीसाईबाबांच्या फोटोची ओळख करून दिली व त्यांचा अंगारा देऊन विश्वास ठेवा असें सांगितलें. तो अंगारा त्यांनीं हॉस्पिटलमध्यें येऊन मला लावला व उशाशीं ठेवून दिला. मी जवळ जवळ ४८ तास बेशुद्ध होतों. मी स्वर्गवासी झालों

असें समजून माझ्याबरोबर काम करणारे माझ्या कारखान्यांतील ५–५० लोक मला बघून गेले. डॉ. गव्हाणकर सुद्धां आले होते. त्यांनीं माझ्या आईवडिलांस धीराचे शब्द सांगून 'तुम्हीं अगदीं घाबरूं नका श्रीसाईसमर्थ त्याला बरें करतील' असें सांगून निघून गेले. त्याच रात्रीं माझ्या पायाशीं एक शुभ्र वस्त्रें धारण केलेली उंच मूर्ति उभी राहिली. मला दुसऱ्या दिवसापासून आराम पडूं लागला. तेव्हांपासून मी डॉ. गव्हाणकर यांच्या-बरोबर शिरडी येथील श्रीसाईंच्या समाधीच्या दर्शनास जात असतों व आतां माझा सर्व भार त्या गुरुमाउलीवरच घालून आहे.

**रामचंद्र बाबाजी साळसकर**

**( ३ )**

मी श्रीसाईबाबांस प्रत्यक्ष पाहिलें नाहीं. व श्रीसाई कोण हेंसुद्धां माहीत नव्हतें. श्रीसाईबाबांची ओळख डॉ. गव्हाणकर यांच्या घरीं असलेल्या फोटोवरून झाली. श्रीसाईबाबांच्या ओळखीनंतर मला त्यांचे पुष्कळ अनुभव आले. श्रीसाईबाबा आपल्या भक्तांकरतां काय करीत नाहींत ? हें दिसून आलें.

१९४४ सालीं पुण्यतिथीचा उत्सव संपल्यानंतर आम्हीं जवळ जवळ बायका–मुलांसह सुमारें ४० मंडळी डॉ. गव्हाणकर यांचेबरोबर शिरडीं मुक्कामीं श्रीसाई समाधी दर्शनासाठीं निघालों. आम्हांला चितळीपर्यंतचीं कशीबशीं तिकीटें मिळालीं व आम्ही सकाळच्या भुसावळ फास्ट पॅसेंजरनें एकाच डब्यांत बसून निघालों. ती गाडी मन-माडला एक तास उशीरा गेल्यानें आम्हांला दौंड–मनमाडवरील कनेक्टेड ट्रेन चुकली. त्यामुळें मनमाडला आम्हीं सर्वजण दुसऱ्या वर्गाच्या वेटिंग रूममध्यें उतरलों. ती वेटिंगरुम एका युरोपियन लेडीच्या चार्जमध्यें असल्यानें तिनें आम्हांला तिकीटें विचारलीं. तिसऱ्या वर्गाचीं आमचीं तिकीटें असल्यानें तिनें मनमाड स्टेशनमास्तरजवळ आमच्या-बद्दल तक्रार केली. स्टेशनमास्तरनीं डॉ. गव्हाणकर यांना 'तुम्हीं आत्तांच्या आत्तां ( दुपारीं दोन वाजले होते. ) दुसऱ्या वर्गाचीं तिकीटें काढा अगर तिसऱ्या वर्गाच्या वेटिंग रूममध्यें चला.' तिसऱ्या वर्गाच्या वेटिंगरुममध्यें तर इतकी घाण होती व जवळच असलेल्या संडासाची इतकी दुर्गंधी सुटलेली होती कीं आम्हांला उलट्याच झाल्या असत्या. पण तेथील डि. जज्ज यांना डॉ. गव्हाणकर भेटले व त्यांनीं आपला पट्टेवाला पाठवून आमची सर्वांची व्यवस्था दुसऱ्या वर्गाच्याच वेटिंगरूममध्यें केली. रात्रीं ९ वाच्या गाडीनें आम्हीं चितळीला जाण्यासाठीं निघालों व रात्रीं १० वाजतां चितळी स्टेशनवर उतरलों. चितळीला स्टेशन मास्तरनी आमची डाक बंगल्यांत व्यवस्था केली. दुसरें दिवशी सकाळीं चितळी स्टेशनवर बस ड्रायव्हरनें आम्हांला अडविलें व शेवटीं रहात्याला पेट्रोल घेण्याच्या बोलीनें तो आम्हांला शिरडीला घेऊन जाण्यास तयार झाला. ठरल्याप्रमाणें रहाते मुक्कामीं आल्यावर बस ड्रायव्हरनें पेट्रोलची मागणी केली पण रहात्यास पेट्रोल कसें मिळणार ? बस ड्रायव्हर तर पेट्रोलशिवाय आम्हांस शिरडीला घेऊन जाण्यास तयार नव्हता. आम्हीं रस्त्यावरच अडकून पडलों होतों. इतक्यांत

समोरच असलेल्या एका टुरींगपाशीं डॉ. गव्हाणकर गेले. ती टुरींग सुपरवाइझर ऑफ इरिगेशन यांची होती. कर्मधर्मसंयोगानें त्यांची व डॉक्टरांची ओळख निघाली व त्यांनीं आम्हांस एक गॅलन पेट्रोल दिलें त्यामुळें आम्हीं एकदाचे शिरडीस जाऊन पोहोंचलों.

परत येतांना गाडी बदलण्याचा त्रास नको म्हणून आम्हीं पुणा–मनमाड रस्त्यानें येण्याचें ठरविलें. ठरल्याप्रमाणें ११–३० वाजतां आम्हीं रहात्यास आलों. बस ड्रायव्हरनें आम्हांस न घेण्याचा चंग बांधला होता. परंतु पेट्रोल संपल्यामुळें बस बसस्टँडपासून एक मैलावर उभी राहिली. व नंतर ती पेट्रोल मिळाल्यावर १२ वाजतां स्टँडवर आली. आम्हीं सर्वजण एकदम बसमध्यें चढल्यामुळें बस ड्रायव्हरचा इलाज हरला तरीपण त्यानें गाडी सीक आहे हें निमित्त करून गाडी १५ मिनीटें चितळीस उशीरां नेली. ट्रेन चितळीस २–१५ ला होती व आम्हीं २–३० ला चितळीस पोहोंचलों. ड्रॉयव्हर मिष्किलपणें आम्हांला म्हणाला ‘ तुमची गाडी चुकली. आतां बसा बोंबा मारीत ! ’ आम्हांला फार वाईट वाटलें, पण जेथें देवाची-साईची कृपा आहे तेथें काय अशक्य आहे ! डॉ. गव्हाणकर स्टेशनमास्तरना भेटले. डॉक्टर गव्हाणकरनां पाहिल्याबरोबर स्टेशनमास्तर म्हणाले ‘ डॉक्टर, फार लकी आहांत बुवा ! गाडी आज अर्धा तास लेट आहे ’ नंतर तो ड्रॉयव्हर पैसे मागण्याकरतां आला त्याला आम्हीं सांगितलें, ‘ तूंच आतां बोंबा मारीत रहा. गाडी आज अर्धातास लेट आहे. ’ त्यावेळीं त्याला पश्चात्ताप झाला व त्यानें आमची क्षमा मागितली. त्याचें बील चुकतें करून आम्हीं सुखरूपपणें मुंबईस आलों. अशारीतीनें त्या साईमाऊलीनें आमचा प्रवास गुलाबाच्या फुलाप्रमाणें मुंबई–शिरडी–मुंबई–हातावर झेलून–सांभाळून करविला. त्या भक्तजनांच्या दुःख नाश कर्त्यास आपण सर्वजण अनन्य भावानें शरण जाऊं या.

**यशवंत वारखंडकर.**

---

संपादक महाशय मुंबई १२

‘ श्री साईलीला ’ यांस स. न. वि. वि.

मी माझा खालील अनुभव आपल्या मासिकांत प्रसिद्ध करण्याकरतां देत आहे. तरी त्याला आपण आपल्या मासिकांत स्थान द्याल अशी आशा आहे.

माझें शिक्षण इंग्रजी ४ थी पर्यंत झालेलें आहे व घरच्या परिस्थितीमुळें मला पुढचें शिक्षण घेणें अशक्य झाल्यानें मी नोकरीच्या खटपटीस लागलों.पण आज चांगल्या शिकलेल्या माणसांस कोणी विचारीत नाहीं तेथें माझ्यासारख्यास कोण विचारतो ? मी नोकरीसाठीं खूप पायपीट केली. पण कांहीं यश येईना. शेवटीं अगदीं हताश झालों व आतां काय करावें हें सुचेना. माझे चुलते ‘ श्रीसाईबाबांचे ’ भक्त आहेत ते नेहमीं डॉ. गव्हाणकर कुर्ला यांजकडे नेहमीं जातयेत असतात. त्यांनींच मला डॉ. गव्हाणकर यांजकडे त्यांच्या कुर्ला येथील रहात्या घरीं नेलें. मी त्यांना माझी सर्व परिस्थिती निवेदन

केली. तेव्हां त्यांनीं माझ्याजवळ एक लहानशी कागदाची पुडी देऊन सांगितलें कीं, 'ही बाबांची उदी आहे. तिचा रोज उपयोग करीत जा, व साईबाबांवर विश्वास ठेव मग तेच तुझी व्यवस्था करतील' त्या दिवसापासून मी त्यांच्या सांगण्याप्रमाणें वागूं लागलों आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं मला आठव्या दिवशींच पोष्ट खात्याकडून बोलावणें आलें.

या गोष्टीस आज आठ–नऊ महिने होऊन गेले. हल्लीं मी आमच्या घराशेजारील पोष्टऑफिसांत पॅकरच्या जागेवर आहे व श्रीसाईकृपेनें आतां सर्व सुरळीत चाललें आहे.

आपला नम्र

**गोपाळ नवसोजी शिरोडकर.**

× × ×

श्रीसांईप्रसन्न. ५० नेताजी सुभाष पथ, ठाणें.

दि. १८-९-१९४८

श्री. संपादक 'श्रीसाईलीला' त्रैमासिक यांसी सप्रेम प्रणाम. वि. वि. खालील अनुभवास आपल्या 'श्रीसांईलीलेंत' स्थान द्याल अशी आशा आहे:—

आमचे परमपूज्य पितृदेव कैलासवासी झाल्यानंतर कांहीं महिन्यांनी, पहांटेस एक स्वप्न पडलें. त्यांत असें दिसलें कीं मी समाधी मंदिरांत मागील दरवाज्यानें आंत शिरत आहे; व समोरच्या दरवाजानें आमचे परमपूज्य पितृदेव हे हातात पळीभांडें, व डोक्यावर त्यांच्या नेहेमीच्या पद्धतीनें शेंडी पसरून, तेथें येत आहेत. आमची दोघांची गांठ साधारण समाधि मंदिराच्या मध्यावर पडली. व ती. काका (म्हणजेच आमचे पितृदेव) मला म्हणाले कीं, अरे बाबुराव, ही गोष्ट अगदी नक्की आहे, कीं अजून बाबा आपल्या घरीं संन्याशाच्या रूपानें येतात. मी लगेच जागा झालो व हें स्वप्न माझ्या सौभाग्यवतीस सांगितलें.

पुढें दि. १५-९-१९४६ रोजीं आमच्या पितृदेवांचे भरणी-श्राद्ध होतें. त्या दिवशीं सकाळीं सुमारे १०॥ वाजतां मी कांहीं पक्षकारांशीं बोलत होतो. इतक्यांत एक संन्याशी आला व म्हणूं लागला कीं आम्ही १०-१२ मंडळी आहोंत. नाशिकला चाललो आहोंत तर आम्हाला १ पायली हरभरे द्या. संन्याशांना बघितल्याबरोबर अर्थातच मला वरील स्वप्नाची आठवण झाली व मनांत अशी खूणगांठ बांधली कीं हे परमवंदनीय सांई-महाराजच यांच्या रूपानें आपल्या घरीं आले आहेत. तर यांना आपण भक्तियुक्त अंतःकरणान नमस्कार करावा; पण समोर पक्षकार बसलेले तर त्यांच्या समोर हें कसें करावें अशी उगाचच मनांत शंका आली. असो. मी त्यांना म्हटलें कीं महाराज, हरभरे सध्यां मिळत नाहीं. दुसरें कांहीं दिलें तर चालेल काय! ते म्हणाले काय देतां–मी म्हटलें कीं तांदूळ देतो. ते म्हणाले द्या. आम्ही फक्त ५ च घरीं भिक्षा मागतो. तेव्हां मी माझा पुतण्या चि. मधुकर उर्फ जगन्नाथ यांस घरांतून एक पायलभिर तांदूळ आणून देण्यास सांगितलें. त्यानें कांहींतरी

२–३ पावशेरच तांदूळ आणले. तें बघितल्याबरोबर ते म्हणाले, 'अहो, तुम्हांला द्याव-याचे असेल तर एक पायली द्या. नाहींतर कांहीं नको. कारण मी २–३ घरीं जाऊन आलों आहे. आतां मला आणखी घरीं जावयाचें नाहीं.' मी चि. जगन्नाथ यांस सांगितलें कीं असें करूं नकोस. १ पायली तांदूळ देण्यासारखे आहेत ना! मग जरूर दे. त्यावर १ आणा दक्षिणा आण. मग त्याप्रमाणें त्यानें केलें. व वर लिहिल्याप्रमाणें मनांत येऊनहि त्यांच्या पायावर डोकें ठेवण्याची मला लाज वाटली म्हणा, माझ्या नशिबीं नव्हतें म्हणा; पण मी खुर्चीवर बसल्याबसल्याच त्यांना हातानें नमस्कार केला व ते आशीर्वाद देत निघून गेले.

ह्यानंतर आमच्याकडे बरेच दिवस कोणीही संन्याशी आले नाहींत. दि.४–२–१९४८ला सकाळीं मी बाहेरून येत असतांना खालतींच मला एक संन्याशी भेटले व चमत्कार असा कीं त्यांनींही नेमके तेंच वाक्य सांगितलें कीं आम्ही १०–१२ मंडळी नाशिकला जावयाला निघालेलों आहोंत. तर आम्हांला एक पायली गहूं द्या. मी म्हटले महाराज माझ्याजवळ गहूं नाहींत. पण आपली मर्जी असेल तर आपणांस १ पायली तांदूळ देऊं शकेन. बरें आहे असें म्हणत ते व मी असे जिना चढून वर आलों; घरांत सांगितलें कीं त्यांना एक पायली तांदूळ द्या; त्याच सुमाराला एका पक्ष-कारानें घाटावरची उत्तम बाजरी आणून दिली होती. सबब एक पायली तांदूळ व एक पायली बाजरी व वर आणा दक्षिणा अशी दिली व ह्या खेपेला मात्र भक्तियुक्त अंतः-करणानें त्यांच्या चरणांवर डोकें ठेविलें. त्यांनीं आशिर्वाद दिला कीं सर्व दानांत अन्नदान हें फार श्रेष्ठ आहे, तुमची दान देण्याकडे प्रवृत्ति आहे हें फार चांगलें आहे.

मागील खेपेला महाराज आले त्यावेळेला पितृदेवांचे भरणी–श्राद्ध होतें. पण ह्या खेपेला महाराजांचें आगमन कशाकरितां झालें हें समजेना; पण हें गूढ लवकरच उकललें. दुसऱ्याच दिवशीं मध्यरात्रीं (म्हणजे दि. ५–२–४८ ला), मला, कांहीं कारण नसतांना मी केवळ राष्ट्रीय स्वयंसेवक संघांत काम करीत होतों म्हणून, सार्वजनिक सुरक्षा कायद्यान्वयें ठाणें जिल्हाअधिकारी यांच्या वॉरंटानुसार अटक करण्यांत येऊन, ठाण्याच्या कारागृहांत स्थानबद्ध करण्यांत आलें. याबद्दलचा उल्लेख मागील अंकांत पूजनीय मातेची दुःखदनिधन वार्ता लिहितांना केला आहे; घरांत घाबरलेली व धास्ती घेतलेली वृद्ध प्रेमळ माता, सौभाग्यवती, थोडे दिवसच अगोदर महाराजांच्या व वडील मंडळींच्या प्रेमळ आशीर्वादानें, झालेलें ५ महिन्यांचे गोडसें बालक श्रीराम, माझ्या डॉक्टर बंधूंच्या दोन लहान मुली चि. मीनाक्षी व उषा, व एक लहान पुतण्या चि. भास्कर, इतकीच मंडळी. पण विधिघटनेपुढें इलाज नव्हता. त्यावेळेचा काळच असा चमत्कारिक होता कीं केव्हां काय होईल हें सांगतां येत नव्हतें. असो, अशा अवघड परिस्थितींत मला १२ मार्चपर्यंत स्थानबद्ध करण्यांत आलें होतें. मला पकडावयाला पोलिसांचे एक वरिष्ठ अधिकारी आले होते. त्यांना मी म्हटलें कीं माझी पोथी व पूजेचा फोटो घेऊं कां! ते म्हणाले कीं कसली पोथी वाचतां व कसली पूजा करतां! मी

त्यांना म्हटलें कीं मी दररोज गुरुचरित्राचा एक अध्याय श्रीमद्भागवद्गीतेचा एक अध्याय वाचतो व आतां श्रीसाईसच्चरित्राचा एक एक अध्याय वाचीन व मी दररोज श्रीसईमहाराजांची पूजा करतो. ते म्हणाले कीं ही सर्व पुस्तकें व फोटो घ्यावयास कांहीं हरकत नाहीं. व मला सांगावयास आनंद वाटतो कीं कारागृहांत सुद्धां महाराजांच्या कृपेनें माझी पूजा व वाचन चुकलें नाहीं. कारागृहांतील एक अधिकारी श्रीसाईभक्त भेटले. माझ्याकडून श्रीसाई सच्चरित्र, माझें वाचून झाल्यानंतर दररोज ते घेऊन जात असत व सकाळीं मला पुन्हां परत आणून देत असत; महाराजांच्या कृपेनें सर्वच कारागृहांतील अधिकारी प्रेमळ व दयाळू अंतःकरणांचे भेटले. सोबतीलाही सर्व सज्जन माणसें होती. असो. तेव्हां मी दि. ४-२-४८ ला मला जें महाराजांचें दर्शन संन्याशाच्या रुपांत झालें त्याचें कारण मी असें समजतो कीं त्यांनीं त्यांच्या दर्शनानें मला असें आश्वासन दिलें कीं मी तुझ्या पाठीमागें आहे. तुला काळजी करण्याचें कारण नाहीं; तेव्हां हा दुसरा प्रसंग, व त्याप्रमाणें तो प्रसंगही श्रीसांईकृपेनें पार पडला.

आतां तिसरा प्रसंग नुकताच म्हणजे मागील रविवार दि. १२-९-४८ रोजीं आला. त्यावेळीं माझे मित्र श्री. घनःश्यामराव गांगल व श्री. यशवंतराव दांडेकर हे बसलले होते. वेळ सुमारे ९-९॥ ची असेल. त्याच दिवशीं सकाळीं आमचे उपाध्याय वे. शा. सं. मोरूकाका फणशीकर हे आमच्येकडे येऊन मला सांगून गेले कीं पूजनीय मातेचें भरणीश्राद्ध येत्या दि. २२ ला येतें आहे. ९-९॥ च्या सुमाराला म्हणजे आमचे उपाध्याय येऊन सांगून गेल्यानंतर, एक संन्याशी आले व सांगू लागले "हल्लींचे दिवस फार वाईट आहेत. लोक म्हणतात पैसे घ्या. पण संन्याशाला पैशांची काय जरूरी आहे. त्यांना पोटाला अन्न लागेल व घालावयाला वस्त्रें लागतील. या शिवाय दुसऱ्या कशाचीही जरूरी नाहीं.' मी त्यांना म्हटलें कीं महाराज, आपली जर हरकत नसेल तर आज आपण आमच्याकडे भोजनाला येऊं शकतां. ते म्हणाले तसें नाहीं. आमच्या बरोबर १०-१२ मंडळी आहेत. त्यापैकीं १ आजारी झाले आहेत. आम्ही सर्व नाशिकला चाललों आहोंत व पुढें आम्हाला पंढरपुरला जावयाचें आहे. तरी तुम्हाला जर द्यावयाचें असेल तर दोन पायली धान्य द्या. घरांत सौभाग्यवती नव्हती. पुतण्या चि. भास्कर हाही नव्हता. पण त्याच दिवशीं चि. जगन्नाथ, त्याची सौभाग्यवती मृणालिनी व नुक्ताच झालेला मुलगा चि. सुरेन्द्र अशी मंडळी माझे घरीं श्रीमहाराजांच्या पाया पडावयाला आली होती; मी चि. उषास सांगितलें कीं २ पायली तांदूळ काढून दे. ती म्हणाली तितके तांदूळ नाहींत. म्हटलें जेवढे असतील तेवढे दे. तेव्हां तिनें दीड पायली तांदूळ काढून दिले. मग ते संन्याशी म्हणाले कीं आतां डाळीकरितां कोणाकडे तरी गेलें पाहिजे. मी म्हटलें, मी देतो तुम्हांला डाळ. ते म्हणाले डाळ मिळाली म्हणजे आम्ही खिचडी करूं शकूं. मग मी त्यांना त्यांच्या इच्छेप्रमाणें १॥ पायली तांदूळ ४ शेर तुरीची डाळ, १ पावशेर मीठ, व थोडा गूळ येवढे जिन्नस दिले. मी त्यांना म्हटलें कीं तिखट देऊं कां ! ते म्हणाले कीं आतां कांहीं नको. आम्ही तुम्हाला फार त्रास

दिला. मी म्हणालो त्रास देण्याचा प्रश्न नाहीं. तरी ते म्हणाले नको; मग ते म्हणाले. आम्ही येवढा तुम्हाला त्रास दिला, तुम्ही येवढें धान्य आम्हाला दिले. तुमच्या नशिबांत आम्हां सर्वांना जेवण दिल्याचे लिहिलेलें होतें म्हणून मला येथें तुमच्याकडे यावयाची बुद्धि झाली. तुम्ही येवढें दिलेंत तर परत आम्ही मात्र तुम्हांला आशिर्वादाशिवाय कांहीं देऊं शकत नाहीं. मी म्हणालो दुसरें कांहीं देण्याची अपेक्षाही नाहीं. नंतर भक्तियुक्त अंतःकरणानें त्यांच्या चरणांवर मस्तक ठेविलें व आशिर्वाद देत व प्रसन्न चित्तानें ते निघून गेले.

दोन वर्षांच्या अवधींत अवघे तिनच वेळां तीन निरनिराळ्या संन्यासांच्या रूपांत महाराजांनीं अशा रीतीनें दर्शन दिलें यांत शंका नाहीं. तिन्ही वेळेला सर्वांची भाषा एक कीं आम्ही नाशिकला चाललों आहोंत. आम्ही १०-१२ मंडळी आहोंत. याचा काय बरें अर्थ असूं शकेल ! त्याचप्रमाणें आम्ही नाशिकला जात आहोंत हें सांगण्याचा काय अर्थ असूं शकेल ! माझ्या समजुतीप्रमाणें आमचे पितृदेव आम्हाला सोडून गेले, त्या वर्षाभरांत आमच्या घराण्यांतील ८–९ मंगळी गेली–( इहलोक सोडून गेली ); कै. पितृदेवांच्या अस्थि, शिर्डीला नेऊन तेथील आज्ञेप्रमाणें; नाशिकला रामकुंडांत विसर्जन केल्या; त्याचप्रमाणें कै. मातेच्याही अस्थि त्याचप्रमाणें शिर्डीला नेऊन नाशिकला रामकुंडांतच विसर्जन केल्या. त्याबद्दलची तर ही साक्ष नसेलना ! कसें कां असेना ! माझ्या मनाला मात्र श्रद्धायुक्त अंतःकरणानें महाराजांचें दर्शन झाल्याचें समाधान व कै. पितृदेवांच्या वाणीची सत्यता पटली यांत कांहीं संशय नाहीं ! कदाचित् निरीश्वरवादी व साधुसंतांच्या शक्तीवर विश्वास न ठेवणारे लोक, ह्या वरील अनुभवाला कांहींच किंमत देणार नाहींत. न देवोत बिचारे ! मला कोठें त्यांच्या मताचे समाधान करावयाला जावयाचें आहे ! बाबांच्याच भक्तांच्या पुढें आलेला अनुभव, जसा घडला तसा दिला आहे. ‘ जया मनीं जैसा भाव तया तैसा अनुभव. ’ श्रीसाईमहाराजांनीं व कै. पूज्य मातापितरांनीं असाच कृपानुग्रह ठेवावा एवढीच त्या सर्वांच्या पूज्य व पवित्र चरणीं नम्र प्रार्थना करून हा लेख संपवितों.

आपला नम्र,

**बाबांच्या बाळाचा बाळ.**

# ॥ श्रीगणेश वरदस्तोत्र ॥

[ श्रीगणेशवरदस्तोत्र हें गणेशभक्त त्रिंबक विठ्ठल सामंत यांचे आज्ञेवरून रा. रा. नारायण गणेश देशपांडे यांनीं केलें व तें गणेशप्रभावमध्यें छापलें. ह्या स्तोत्राचा फायदा पुष्कळ लोकांनीं घेतला. जरी हें ‘ साईलीला मासिक असलें तरी–साई हा गणपतीच आहे असें मानून हें स्तोत्र वाचलें तर त्याचा फायदा होईल. कलियुगांत ‘ कलौ चंडि विनायकाः । ’ विनायक व चंडी यांचें प्राबल्य आहे. म्हणून सर्व भक्तांना याचा फायदा व्हावा म्हणून कर्तें रा. रा. नारायण गणेश देशपांडें यांची परवानगी घेऊन छापलें आहे.]

॥ ॐ नमोजी श्रीगणेशा । ॐ नमोजी बुद्धिप्रकाशा ॥
॥ ॐ नमोजी गुणेशा । सिद्धिदायका तुज नमो ॥ १ ॥
॥ ॐ नमोजी ॐ कारा । ॐ नमो चराचरा ॥
॥ ॐ नमो गणेश्वरा । गणपालनतत्परा तुज नमो ॥ २ ॥
॥ ॐ नमो वागेश्वरी । ॐ नमो ब्रह्मकुमारी ॥
॥ ॐ नमो वाचाचारी । सर्व सत्ताधारी तुज नमो ॥ ३ ॥
॥ ॐ नमो सद्‌गुरुराजा । ॐ नमो अधोक्षजा ॥
॥ ॐ नमो कैलास राजा । शंभुदेवा तुज नमो ॥ ४ ॥
॥ ॐ नमो दत्तात्रेया । ॐ नमो अत्रि अनुसूया ॥
॥ ॐ नमो स्वामी सखया । रामराया तुज नमो ॥ ५ ॥
॥ ॐ नमो सकलसंतां । सिद्धि साधु आणि महंतां ॥
॥ ॐ नमो प्राणनाथा । श्री हनुमंता तुज नमो ॥ ६ ॥
॥ ॐ नमो इष्ट देवा । ॐ नमो मोक्ष देवा ॥
॥ ॐ नमो कुल–देवा । कालदेवा तुज नमो ॥ ७ ॥
॥ ॐ नमो वास्तु देवा । ॐ नमो ग्रामदेवा ॥
॥ ॐ नमो मातृदेवा । पितृदेवा तुज नमो ॥ ८ ॥
॥ श्री अष्टोत्तर शतमाला । करायाची आज्ञा मला ॥
॥ देऊनि बुद्धि बाळकाला । वरदस्तोत्र घडवावें ॥ ९ ॥
॥ ॐ नमो गणेश्वरा । ॐ नमो गतीश्वरा ॥
॥ ॐ नमो गजवरा । गुणगर्वधरा तुज नमो ॥ १० ॥
॥ ॐ नमो गणेशा । ॐ नमो गणाध्यक्षा ॥
॥ ॐ नमो गुरुदशा । गुरुपुरुषा तुज नमो ॥ ११ ॥
॥ ॐ नमो गुणेश्वरा । ॐ नमो गान चतुरा ॥
॥ ॐ नमो गानपरा । गजरुपधरा तुज नमो ॥ १२ ॥
॥ ॐ नमो गुरुधर्म धुरंधरा । ॐ नमो गुणवत् पोषण करा ॥
॥ ॐ नमो गणपालन तत्परा । गजासुरयोद्धरा तुज नमो ॥ १३ ॥
॥ ॐ नमो गंधर्व संशयच्छेत्रा । ॐ नमो गुरुमंत्र गुरुतंत्रा ॥
॥ ॐ नमो गुह्यप्रवरा । गुरुगर्वहरा तुज नमो ॥ १४ ॥
॥ ॐ नमो गणस्वामिना । ॐ नमो गजानना ॥
॥ ॐ नमो गुणसंपन्ना । गानप्राणा तुज नमो ॥ १५ ॥

|| ॐ नमो गणदुःख प्रणाशना । ॐ नमो गुणवत्‌छत्र सूदना ||
|| ॐ नमो गजध्वना । हे गुणप्राणा तुज नमो || १६ ||
|| ॐ नमो गानज्ञान परायणा । ॐ नमो देव गौणा ||
|| ॐ नमो गानध्यान परायणा । गानभूषणा तुज नमो || १७ ||
|| ॐ नमो गुरुप्राणा । ॐ नमो गुरुगुणा ||
|| ॐ नमो गंधर्वभाजना । गणप्रथित नाम्ना तुज नमो || १८ ||
|| ॐ नमो गुरुलक्षण संपन्ना । ॐ नमो गंधर्ववरदर्पघ्ना ||
|| ॐ नमो गंधर्व प्रीतिवर्धना । गुरुतत्वार्थदर्शना तुज नमो ||१९||
|| ॐ नमो गणाराध्या । ॐ नमो गुण-हृद्या ||
|| ॐ नमो गुरु आद्या । गुण आद्या तुज नमो || २० ||
|| ॐ नमो गुरुशास्त्रालया । ॐ नमो गुरुप्रिया ||
|| ॐ नमो गणप्रिया । गणंजया तुज नमो || २१ ||
|| ॐ नमो गंधर्व प्रिया । ॐ नमो गकार बीज निलया ||
|| ॐ नमो गुरुश्रिया । गुरुमाया तुज नमो || २२ ||
|| ॐ नमो गजमाया । ॐ नमो गंधर्व संसेव्या ||
|| ॐ नमो गंधर्व गान श्रवण प्रणया । गंधर्वस्त्रिभिराध्या तुज नमो ||२३||
|| ॐ नमो गणनाथा । ॐ नमो गण-गर्भस्था ||
|| ॐ नमो गुणिगीता । गुरुस्तुता तुज नमो || २४ ||
|| ॐ नमो गणरक्षणकृता । ॐ नमो गण नमस्कृता ||
|| ॐ नमो गुणवत्‌ गुणचित्तस्था । गुरुदेवता तुज नमो || २५ ||
|| ॐ नमो गंधर्वकुल देवता । ॐ नमो गजदंता ||
|| ॐ नमो गुरुदैवता । गंधर्वप्रवणस्वांता तुज नमो || २६ ||
|| ॐ नमो गंधर्व गण संस्तुता । ॐ नमो गंधर्व गीत चरीता ||
|| ॐ नमो गानकृता । हे गर्जता तुज नमो || २७ ||
|| ॐ नमो गणाधिराजा । ॐ नमो देव गजा ||
|| ॐ नमो गुरुभुजा । देव गजराजा तुज नमो || २८ ||
|| ॐ नमो गुरुमूर्ति । ॐ नमो गुण कृति ||
|| ॐ नमो गजपती । गणवल्लभमूर्ती तुज नमो || २९ ||
|| ॐ नमो गणपती । ॐ नमो गुरुकीर्ति ||
|| ॐ नमो गीर्वाण संपत्ती । गीर्वाण गण सेविती तुज नमो || ३० ||

|| ॐ नमो गुरु त्राता । ॐ नमो गण ध्याता ||
|| ॐ नमो गणत्राता । । गणगर्व परिहर्ता तुज नमो || ३१ ||
|| ॐ नमो गणदेवा । ॐ नमो गानभुवा ||
|| ॐ नमो गंधर्वा । गानसिंधवा तुज नमो || ३२ ||
|| ॐ नमो गणश्रेष्ठा । ॐ नमो गुरुश्रेष्ठा ||
|| ॐ नमो गुणश्रेष्ठा । गणगर्जित संतुष्टा तुज नमो || ३३ ||
|| ॐ नमो गणसौख्यप्रदा । ॐ नमो गुरुमानप्रदा ||
|| ॐ नमो गुणवत् सिद्धिदा । गान विशारदा तुज नमो || ३४ ||
|| ॐ नमो गुरुमंत्र फलप्रदा । ॐ नमो गुरु संसार सुखदा ||
|| ॐ नमो गुरु संसार दुःखभिदा । गर्वि गर्वनुदा तुज नमो ||३५||
|| ॐ नमो गंधर्वा भयदा । ॐ नमो गणाश्रीदा ||
|| ॐ नमो गर्जन्नाग युद्धविशारदा। गान विशारदा तुज नमो ||३६||
|| ॐ नमो गंधर्व भयहारका । ॐ नमो प्रीतिपालका ||
|| ॐ नमो गणनायका ! गंधर्व वरदायका तुज नमो || ३७ ||
|| ॐ नमो गुरुस्त्रिगमनें दोषहारका । ॐ नमो गंधर्व संरक्षका ||
|| ॐ नमो गुणज्ञा गंधका । गंधर्वप्रणयोत्सुका तुज नमो || ३८ ||
|| ॐ नमो गंभीर लोचना । ॐ नमो गंभीर गुणसंपन्ना ||
|| ॐ नमो गंभीर गति शोभना । देव गजानना तुज नमो || ३९ ||
|| हें गणेश स्तोत्र पठण करतां । देहीं नांदे आरोग्यता ||
|| कार्यसिद्धि होय तत्वतां । संशय मनीं न धरावा || ४० ||
|| धनार्थि यानें एकवीस दिन । सुप्रभातीं उठोना ||
|| करितां स्तोत्र पठण । धनप्राप्ति होय त्यासीं || ४१ ||
|| जो प्रतिदिनी त्रिवार पठत । त्यासी पुत्र, धन, धान्य प्राप्त होत ||
|| श्री गणेश पुरवी इच्छित । यदर्थीं संशय न धरावा || ४२ ||
|| ज्यावरी संकट दुर्धर । तयानें एकादश वेळ स्तोत्र ||
|| पठतां त्याचें भयथोर । तात्काळ निरसेल || ४३ ||
|| त्र्यंबकराय गणेश भक्त । जनदुःखें कष्टी होत ||
|| होऊनियां कृपावंत । स्तोत्र बीजयुक्त करविती || ४४ ||
|| गणेशसुत नारायण । केवळ मूढ अज्ञान ||
|| त्यास कैचें असे ज्ञान । वरदस्तोत्र करावया || ४५ ||

॥ कलियुगीं नाम वरीष्ठ । साक्ष देती श्रेष्ठ श्रेष्ठ ॥
॥ म्हणोनिया स्तोत्र पाठ । संतमहंत करीताती ॥ ४६ ॥
॥ हें स्तोत्र केवळ चिंतामणी । नाम रत्नांची खाणी ॥
॥ स्तोत्र पठोनिया वाणीं । साधकें शुद्ध करावी ॥ ४७ ॥
॥ स्तोत्रपठणें पुरुषार्थ चारी । साध्य होती घरचे घरीं ॥
॥ म्हणोनिया याचेवरी । शुद्धभाव ठेवावा ॥ ४८ ॥
॥ अति सात्त्विक पुण्यवंत । त्यासीच येथें प्रेम उपजत ॥
॥ भावें करीती स्तोत्र पाठ । त्यांसी गणेश संरक्षी ॥ ४९ ॥
॥ शके अठराशें साठ । बहुधान्य संवत्सर श्रेष्ठ ॥
॥ श्री विनायकी चतुर्थी येत । शुक्रवार दीन भाग्याचा ॥ ५० ॥
॥ हेच दिनीं हें वरदस्तोत्र । पूर्ण झालें अतिपवित्र ॥
॥ वरदहस्तें गजवक्त्र । पठणें भक्तां सांभाळी ॥ ५१ ॥
॥ इति श्री गणेशवरद स्तोत्र । श्रवणें होती कर्ण पवित्र ॥
॥ विजय होईल सर्वत्र । आणि शांति लाभेल ॥ ५२ ॥

॥ ॐ **शांतिः शांतिः शांतिः** ॥

# : स्त्रियांस परमार्थाची शिकवण :

॥ **ओवी** ॥

स्त्रियेसिं केवळ दैवत भर्तार । तीर्थव्रत क्षेत्र देव तोचि साचार ।
भर्तार सेवेवांचुनी नर्क अघोर । युगानयुगीं स्त्रियेसी ॥ १ ॥
जे स्त्री पतिसेवेसी निजभावें सादर । तयेचे चरणरज वंदिती सुरवर ।
प्रत्यक्ष ब्रह्म आणि हरीहर । जालीं बाळकें अनुसूयेचीं ॥ २ ॥
म्हणोनी ज्या सुवासिनी समभर्तृका । तेही अत्यादरें सेवावें निजनायका ।
तेणेविण न भजावें सहसा आणिका । कायावाचा मनेसी ॥ ३ ॥
सकामता अथवा निष्कामता । स्त्रियेसी भर्तारचि पूज्य तत्वता ।
यद्यपि ज्ञानप्राप्ति व्हावी ऐसें वाटलें चित्ता । तरि भर्तार आज्ञा गुरुसेव्य ॥ ४ ॥
यद्यपि भर्तारासी नसली ज्ञानीं श्रद्धा । आणि स्त्रियेसी सत्संगें उपजली मेधा ।
तरि भर्तार आज्ञेवाचुनि कदा । ज्ञान विचार न करावा ॥ ५ ॥
भर्तारें विना करितां ज्ञानप्राप्ति । स्त्रियेसी सहसा होय अधोगति ।
म्हणोन भर्तार सेवेवांचुनि उत्तम गती । स्त्रियेसी सर्वथा घडेना ॥ ६ ॥
मुख्य पतिव्रतेचें स्वधर्माचरण । त्रिशुद्धि करावें भर्तार सेवन ।
तेंचि तियेचें विधि उपासन । तेणेचि होय ज्ञानप्राप्ति ॥ ७ ॥

स्वा. दि. ६–५ मधील उतारा.

# —शिर्डीवृत्त—

## —जुलै—

या महिन्यांत नेहमींप्रमाणें भक्तांची येजा निरनिराळ्या प्रांतांतून होत होती. संस्थानमध्यें चालणारीं रोजचीं धर्मकृत्यें म्हणजे अभिषेक, अर्चन, लघुरुद्र आरती वगैरे नेहमीप्रमाणें चालू होती. एक दोन भक्तांच्या श्रीसत्यनारायणाच्या पूजा समाधी-मंदिरांत झाल्या. या महिन्यांत एकंदर तीन कीर्तनें झालीं. आषाढी एकादशीच्या दिवशीं समाधीस मंगल स्नान घालण्यास येऊन गांवांतून श्रींच्या पालखीची मिरवणूक काढली होती. शिर्डी येथील हवापाणी अगदीं उत्तम आहे.

॥ **श्रीसाईनाथ प्रसन्न** ॥

श्रीसाईसच्चिदानंदसद्गुरु साईबाबामहाराज शिर्डी यांचा **श्रीगुरुपौर्णिमाउत्सव** शके १८७० आषाढ शु. १५ ता. २० जुलै १९४८ मंगळवार रोजीं श्रीमंदिरांत झाला. उत्सवाचा कार्यक्रम ता. १९।७।४८ सोमवार रोजीं नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त सायंकाळीं ह. भ. प. केशवदास बुवा सिकंदराबादकर यांचे कीर्तन व रात्रौ श्रींचे पालखीची मिरवणूक, ता. २०।७।४८ मंगळवार रोजीं नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त श्रींचे समाधीस पंचामृत मंगल स्नान सायंकाळीं संस्थानगवई यांचें कीर्तन, रात्रौ रथाची मिरवणूक नंतर श्री. दत्तात्रय पांडुरंग फडके यांचे श्रीसाईचरित्रावर पोवाडे—गायन झाले. संस्थानतर्फे एक रुपया नारळ प्रसाद देण्यांत आला. नंतर पहांटे ६ वाजेपर्यंत पुणें येथील श्रीसाईनाथमंडळ यांचे भजन—गायन हार्मोनियम फिडल, फ्ल्यूट, सनई वगैरे कार्यक्रम खालील मंडळींनीं केले. श्री. दामोदर केशव बेलापूरकर सनईवादन, श्री. बाबुराव मनोहर शिंदे, हार्मोनियम, श्री. रंगनाथ बाळा बेलापूरकर तबलावादन, श्री. राजाराम देशपांडे पुणें हार्मोनियमवादन, अनंत महादेव जोशी पुणें गायन, श्री. रामचंद्र कोंडाजी हार्मोनियम वादन, फ्ल्यूटवादन, श्री. रघुनाथ कृष्ण पाध्ये पुणें गायन, श्री. शंकर बाबुराव नगरकर सनईवादन अशा गुणी मंडळींनीं रात्रभर श्रीपुढें कार्यक्रम केले, त्यांना प्रत्येकास एक रुपया व नारळप्रसाद संस्थानतर्फे देण्यांत आला. ता. २१।७।४८ बुधवार रोजीं नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळीं ११॥ ते १२॥ पर्यंत गोपाळकाला कीर्तन दहीहंडी प्रसाद वगैरे होऊन उत्सव समाप्त झाला. उत्सवांत कोपरगांव येथील श्री. बाबुराव न्हावी यांचा चौघड्याचा ताफा आला. त्याला संस्थानतर्फे ७ रुपये देण्यांत आले. येणेंप्रमाणें श्रींचा गुरुपौर्णिमाउत्सव झाला.

**श्री. वा. देव.**
सेक्रेटरी साईसंस्थान, शिरडी.

## विनंतीः—

कै. देवांचे चरित्र, अपूर्ण असलेलें पुढील अंकीं छापलें जाईल.

सर्व साईभक्तांनी आपले **साईबाबां**विषयींचे अनुभव, कविता, अगर पोवाडे लवकर पाठवून द्यावे. हे 'साईलीला' मासिक असल्यामुळें साईबाबांविषयीं जितकं जास्त असेल तितकें बरे.

# श्री. साईबाबा शिरडी संस्थानांत

## विक्रीकरितां असलेलीं पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १ | श्री साई सच्चरित्र [मराठी] | किं. रु. ७–०–० |
| २ | सच्चरित, [इंग्रजी] | ४–०–० |
| ३ | दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवनमंजरी | ०–२–० |
| ४ | ,, [अध्याय ४ था] | ०–८–० |
| ५ | सगुणोपासना | ०–३–० |
| ६ | प्रधानकृत पुस्तक [इंग्रजी] | १–४–० |

वरील पुस्तकांकरितां व बाबांचे विश्वासनीय निरनिराळ्या साईजच्या फोटो वगैरेकरितां खालील पत्त्यावर लिहावें.

म्यानेजर, **शिरडी संस्थान**, मु. शिरडी, पो. रहातें, जि. **अहमदनगर.**

श्री. वि. आ. वैद्य मु. चाचडची चाळ, वरसावा रोड, अंधेरी **मुंबई.**

---

श्री साईबाबा शिरडी संस्थान कमिटी तर्फे

संपादकः– **डॉ. के. भ. गव्हाणकर** यानी, काळाचौकी रोड, मुंबई १२ येथें प्रसिद्ध केलें.

मुद्रक:– **के. एन. सापळे**, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस ज्यूडेक्स बिल्डिंग, त्रिभुवन रोड, **मुंबई ४.**